॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५ ००१

**North Maharashtra University, Jalgaon-425 001**

दुरध्वनी क्र. ०२५७-२२५७४९५, २२५८४९६

'A' Grade
NAAC Re-accredited
(3rd Cycle)

५/२/२०१८

## विषय :- श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत आयडीयल विभागात नाव नोंदणी करणेबाबत...

**संदर्भ :-** श्रेणी सुधार नियमावली जा.क्र. : उमवि/७-अ/श्रेणी सुधार/३५२६/२०१४, दि. २५/०७/२०१४

श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत असलेली नियमावली जा.क्र. श्रेणी सुधार नियमावली जा.क्र. : उमवि/७-अ/श्रेणी सुधार/३५२६/२०१४, दि. २५/०७/२०१४ अन्वये लागू करण्यात आलेली असुन सदर नियमावली विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदर नियमावलीनुसार ज्या विद्यार्थ्यांना अध्यादेश १७४ नुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार करावयाची आहे, त्यांनी आयडीयल विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विभागाचे मा. संचालक यांचे मार्फत विहित शुल्कासह दि. १५ फेब्रूवारी २०१८ ते दि. १५ मार्च २०१८ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज सदर विभागाकडे सादर करावेत.

विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

### श्रेणी / गुणवत्ता सुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सुचना

- ज्या विद्यार्थ्यांनी आयडीयल विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठाची बी.ए./बी.कॉम/एम.ए. (सर्व विषय)/एम.कॉम/एम.एस्सी. (गणित)/एम.ए. शिक्षणशास्त्र/ एल.एल.एम./एम.बी.ए. ही पदवी घेतली असेल व ज्यांना सदर पदवी श्रेणी / गुणवत्ता सुधार करावयाची असेल अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अधिकार मंडळाने अध्यादेश १७४ लागू केलेला आहे.

### नाव नोंदणी कार्यवाही करणेबाबतची नियमावली खाली दिल्याप्रमाणे

१. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या वर नमुद केलेल्या पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमविची पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत एका वेळी एकाच वर्गाची नाव नोंदणी करण्याची संधी देण्यात येईल. श्रेणी / सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी सलग तीन परीक्षा संधीपर्यंत राहील.या तीन संधीमध्ये जर विद्यार्थ्याची श्रेणी / गुणवत्ता सुधार झाली नाही तर त्यास तीन पेक्षा जास्तीच्या संधीची आवश्यकता वाटत असल्यास अशा जास्तीच्या दोन संधी म्हणुन सलग पाच

संधी पर्यंत नोंदणी ठेवता येईल व पुढील दोन जास्तीच्या प्रत्येक संधीसाठी परीक्षा अर्जासोबत अतिरिक्त परीक्षा शुल्क रु. १,०००/- घेण्यात येईल. सदर पाच संधीत श्रेणी / गुणवत्ता सुधार झाली नाही किंवा सदर संधी संपण्यापूर्वी नाव नोंदणी रद्द केली तर अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव पुन्हा नव्याने श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करता येणार नाही.

२. नाव नोंदणी अर्ज व माहिती पत्रक आयडीयलच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.वरील संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजुस असलेल्या Distance Education/IDEAL या लिंकवर क्लिक करावे त्यानंतर येणाऱ्या पेजवरील डाव्या बाजुस असलेल्या IDEAL Class Improvement २०१८ या लिंकवर क्लिक करावे.

नाव नोंदणी अर्जासोबत विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

i. मूळ गुणपत्रक (द्वितीय व तृतीय वर्ष) व दोन प्रमाणित छायांकित प्रती
ii. मूळ पासिंग सर्टिफिकेट व दोन प्रमाणित छायांकित प्रती (जर प्राप्त केले असेल तर)
iii. पदवी प्रमाणपत्र घेतले नसल्यास खालील नमुद केलेल्या नमुन्यानुसार रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**३. (नाव नोंदणी करते वेळी रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर खालीलप्रमाणे मा. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) सादर करणे आवश्यक आहे)**

मी -------------------------------------------------------- सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, मी आयडीयल विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठातुन सन ----------------- या वर्षी पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले आहे.

१. * मी विद्यापीठाकडून आजपर्यंत -------------------------- या पदवी / पदव्युत्तर पदवीचे प्रमाणपत्र घेतलेले नाही व पदवी मिळण्यासाठी अर्ज केला नाही.

**किंवा**

२. * मी पदवी / पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला आहे / पदवी / पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र मिळणेबाबत शुल्क भरलेले आहे. मात्र पदवी / पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास मी विद्यापीठास लगेच परत करेल.

यातील संपूर्ण मजकुर खरा असुन खोटा आढळल्यास मी कायदेशीर शिक्षेस व दंडास पात्र राहील.

मा. कार्यकारी दंडाधिकारी      विद्यार्थ्याचे नाव ------------------

* लागू नसेल ते खोडावे      विद्यार्थ्याची स्वाक्षरी ---------------

**४. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजना अंतर्गत नाव नोंदणी अर्जासोबत भरावयाचे शुल्क महत्वाचे - सदर योजने अंतर्गत एकूण लेखी परीक्षेच्या १/३ म्हणजे खालील शिक्षणक्रमांना उपलब्ध असलेल्या एकूण विषयांपैकी फक्त दोनच विषयांसाठी श्रेणी /गुणवत्ता सुधार अर्ज करता येईल. त्यासाठीचेच एकूण शुल्क खालील तक्त्यात नमुद केले आहे.**

| अ.क्र. | तपशील | शुल्क (रुपये) |
|---|---|---|
| ०१. | **नोंदणी अर्ज शुल्क (पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांसाठी)** | ४०/- |
| ०२. | **नोंदणी शुल्क** | २५०/- |
| ०३. | **परीक्षा शुल्क नियमीत परीक्षा शुल्काच्या दुप्पट** | |
| | बी.ए. | ७००/- |
| | बी.कॉम. | ७५०/- |
| | एम.ए. (सर्व विषय)/एम.कॉम./एम.एस्सी. (गणित) | ९५०/- |
| | एम.ए. शिक्षणशास्त्र/एल.एल.एम. | १२००/- |
| | एम.बी.ए. | २०००/- |
| ०४. | **केंद्रीय मूल्यमापन प्रक्रिया (कॅप) शुल्क** | |
| | बी.ए., बी.कॉम. | १००/- |
| | एम.ए. (सर्व विषय)/एम.कॉम./एम.एस्सी. (गणित) | २००/- |
| | एम.ए. शिक्षणशास्त्र/एल.एल.एम./ एम.बी.ए. | ३५०/- |
| ०५ | **गुणपत्रक शुल्क व पासींग सर्टिफिकेट शुल्क परीक्षेच्या परिपत्रकानुसार (संदर्भ परिपत्रक क्र. २ व ३ २०१६ नुसार)** | |
| | पासिंग सर्टिफिकेट शुल्क (बी.ए./बी.कॉम/एम.ए. (सर्व विषय)/एम.कॉम (सर्व विषय)/ एम.एस्सी. (गणित) ई सुविधा अंतर्गत ) | ७०/- |
| | एम.ए. शिक्षणशास्त्र/ एल.एल.एम./एम.बी.ए. | ८०/- |
| ०६. | **गुणपत्रक शुल्क** | |
| | (बी.ए./बी.कॉम/एम.ए. (सर्व विषय)/एम.कॉम (सर्व विषय)/ एम.एस्सी. (गणित)/ एम.ए.शिक्षणशास्त्र/एल.एल.एम. ई सुविधा अंतर्गत ) | ७०/- |
| | एम.बी.ए. | १२०/- |
| ०७. | **पदवी प्रमाणपत्र (पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांसाठी)** | ५००/- |

- **वरील तक्त्यानुसार खालीलप्रमाणे शिक्षणक्रमनिहाय एकूण शुल्क विद्यार्थ्यांना भरावयाचे आहे.**

| **अ.क्र.** | **शिक्षणक्रम** | **एकूण शुल्क** |
|---|---|---|
| ०१. | बी.ए. | १७३०/- |
| ०२. | बी.कॉम. | १७८०/- |
| ०३. | एम.ए. (सर्व विषय)/एम.कॉम./एम.एस्सी. (गणित) | २०८०/- |
| ०४. | एम.ए. शिक्षणशास्त्र/एल.एल.एम. | २४९०/- |
| ०५. | एम.बी.ए. | ३३४०/- |

वरील सर्व शुल्कांचे एकत्रित चलन सोबत जोडले आहे. सदरचे चलन हे जळगाव, धुळे, नंदूरबार या तीनही जिल्ह्यातील नजीकच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत जाऊन भरावयाचे आहे. त्यानंतर सदर चलनाची IDEAL/Finance नावाचा उल्लेख असलेली प्रत सदर अर्जासोबत जोडावयाची आहे.

५. अध्यादेशाप्रमाणे ज्या वर्गासाठी नाव नोंदणी करावयाची आहे त्यासाठी असणाऱ्या एकूण लेखी पेपरच्या कमीत कमी १/३ पेपरची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. (जर दोन किंवा दोन पेक्षा अधिक वर्ग मिळून श्रेणी देण्यात येत असेल तर श्रेणीसाठी सर्व वर्गांच्या लेखी पेपरपैकी किमान १/३ इतक्या पेपरची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. जे विषय नाव नोंदणी अर्जात नमूद केले असतील, तेच विषय परीक्षा अर्जावर नमुद करणे आवश्यक आहे. त्याच विषयाची परीक्षा श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत देता येईल. मात्र एकदा घेतलेले विषय कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाहीत. पूर्वी प्राप्त केलेल्या मुळ गुणपत्रकात जर कोणत्याही विषयास अध्यादेश लाभ देण्यात आला असेल तर श्रेणी सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करतांना सदरच्या विषयाचीही पुन्हा नाव नोंदणी करणे बंधनकारक राहील.

६. ज्या विद्यार्थ्यांनी ५ वर्षाच्या आत विद्यापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी घेतली असेल त्यांनाच श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करता येईल. ५ वर्षापूर्वी पदवी / पदव्युत्तर पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करता येणार नाही. कारण अभ्यासक्रम / पॅटर्न बदल झाले असल्यामुळे समकक्ष विषयांची अडचण येते.

७. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत विद्यार्थ्यास अध्यादेशाप्रमाणे ग्रेस / कन्डोनेशनच्या गुणांचा फायदा मिळणार नाही. तसेच सदर विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे बक्षीस पदक इत्यादींचा लाभ मिळणार नाही.

८. ज्या विषयामध्ये विद्यापीठाची लेखी व प्रात्याक्षिक किंवा तोंडी परीक्षा द्यावी लागत असेल किंवा विद्यापीठाची लेखी व विद्यापीठ विभागामार्फत घेण्यात येणारी विभागीय अंतर्गत परीक्षा घेतली जात असेल अशा विषयांच्या प्रात्याक्षिक परीक्षेचे, तोंडी परीक्षेचे किंवा अंतर्गत परीक्षेचे पूर्वीच प्राप्त केलेले मुळ गुण ग्राह्य धरले जातील. विद्यार्थ्यांना श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत फक्त लेखी परीक्षेसाठी पेपरची परीक्षा देता येईल. तसेच ज्या विषयांना पूर्वी प्रात्याक्षिक परीक्षा नव्हती, त्यांना त्या विषयांच्या एकूण गुणांच्या टक्केवारीत मिळालेल्या गुणांचे रुपांतर करुन श्रेणी देण्यात येईल. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने

अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांचे नोंदणी करतेवेळी दिलेले उद्दिष्ट पूर्ण झाल्यास त्याला गुणपत्रक पाठविण्यात येईल. परंतू, ज्या विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांना लेजरची प्रत पाठविण्यात येईल.

९. श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत निकाल जाहीर करतांना ज्या विषयाची निवड, श्रेणी सुधार करण्यासाठी केलेली आहे, त्या विषयांचे नवीन प्राप्त झालेलेच गुण ग्राह्य धरुन श्रेणी सुधार योजनेचा निकाल जाहीर करण्यात येईल.

१०.ज्या विद्यार्थ्यांची श्रेणी बदलत नसेल परंतू, गुणात वाढ झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांना त्यांनी गुणपत्रकाची मागणी त्यावेळी केल्यास वाढीव गुणांचे गुणपत्रक देता येईल. मात्र त्याकरीता त्यांना नाव नोंदणी रद्द करण्याबाबतचा हस्तलिखीत अर्ज मा. संचालक यांच्या शिफारशीनुसार सादर करणे आवश्यक राहील. जर अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील संधीमध्ये गुणात वाढ झाली नाही व त्यांनी मागील संधीत गुणात वाढ झाल्याने गुणपत्रक मागणी केल्यास त्यांना वाढीव गुणाचे गुणपत्र दिले जाणार नाही. तर अशा विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करतेवेळी जमा केलेले पूर्वीचे गुणपत्रक देण्यात येईल. नोंदणी करतांना जेवढे विषय भरले असतील त्या सर्व विषयांच्या पूर्वीच्या सर्व गुणांची संपादणूक रद्द समजण्यात येईल. त्यामुळे नोंदणीकृत काही विषयांचे पूर्वीचे गुण व काही विषयांचे नवीन गुण असे कुठल्याही परीक्षार्थीचे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**(नाव नोंदणी करतेवेळी भरुन देणे आवश्यक आहे )**

मी ------------------------------------------------------------द्वारा आयडीयल विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विभागात ----------------------- या वर्गाची श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करीत आहे.

१. मी संपूर्ण नियमावली वाचलेली असुन मला ती मान्य आहे.
२. मला उत्तीर्ण (पास क्लास) मिळालेला असुन ही नाव नोंदणी मी द्वितीय श्रेणी ५५% गुण / प्रथम श्रेणी मिळविण्यासाठी करीत आहे.
३. मला द्वितीय श्रेणी मिळालेली असुन ही नाव नोंदणी मी ५५% गुण / प्रथम श्रेणी मिळविण्यासाठी करीत आहे.

वरीलप्रमाणे माझी श्रेणी / गुणवत्ता सुधार झाल्यासच माझा निकाल जाहिर करुन मला सुधारीत गुणपत्रक देण्यात यावे. अन्यथा, मला मिळालेले गुण फक्त कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांची सही -----------------------------

मा. संचालकांची सही व शिक्का----------------------

वरील नियम व अध्यादेश आणि वेळोवेळी होणारे बदल सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

**महत्वाची सुचना-**

कृपया अर्ज व सोबत जोडावयाची परिशिष्टे (नमुना) आणि आवश्यक कागदपत्रे दिलेली आहेत. अर्जाची व परिशिष्टांची प्रिंट काढून काळजीपूर्वक माहिती भरावी. व आवश्यक ती कागदपत्रे आणि बँकेत शुल्क भरल्याचे चलन जोडून दि. १५ मार्च २०१८ रोजी पावेतो खालील पत्त्यावर पाठवावेत. सदर दिनांकानंतर आलेल्या अर्जांचा स्विकार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता**

**मा. संचालक, आयडीयल विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पिनकोड - ४२५००१**

**संपर्कासाठी : दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७४९५/२२५८४९६**

**सदर परीक्षेसाठी आयडीयल विभागाद्वारे शुभेच्छा !**

मा. संचालक,
आयडीयल विभाग